संगणक संकेतांक २०१२२०१११४३७४८७८२५

RNI No. MAHBIL/2009/31748
Reg. No. MH/MR/South-324/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ४, अंक ३०] बुधवार, जुलै ४, २०१२/आषाढ १३, शके १९३४ [ पृष्ठे ३, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ९३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

### नगरविकास विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जुलै २०१२

### अधिसूचना

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८.**

क्रमांक एमएमसी-२०१२/२२३/प्र.क्र. ६८/२०१२/नवि-३२(१).—ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम, २०१२ यामध्ये तातडीने सुधारणा करण्याची गरज उद्‌भवली आहे ;

आणि ज्याअर्थी पूर्व प्रसिद्धीची शर्त काढून टाकणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबाबत महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे ;

त्याअर्थी, आता, मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा मुंबई तीन) चे कलम ५ च्या पोट-कलम (१) चे खंड (ब) व कलम २९, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई एकोणसाठ) चे कलम ५ च्या पोट-कलम (२) चे खंड (ब) व कलम ४५६-अ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड दोन) चे कलम ९ च्या पोट-कलम (१) चे खंड (ब) व कलम ४२० चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व आणि राज्य निवडणूक आयुक्त यांचेशी सल्लामसलत करून महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम, २०१२ यामध्ये पुढील सुधारणा करीत आहे, ते असे.—

१. या नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) सुधारणा नियम, २०१२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या), नियम, २०१२ (ज्यांचा यापुढे " मूळ नियम " असा उल्लेख करण्यात येईल) च्या नियम ३ ऐवजी खालील नियम दाखल करण्यात येईल :—

"३. पालिका सदस्यांच्या नामनिर्देशनासाठी बैठक घेणे.—नियम ४ मधील तरतुदीस अधीन राहून सार्वत्रिक निवडणुकीनंतर निवडणुकांचे निकाल अधिसूचित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्यानंतर लगतच घेण्यात येणाऱ्या महापालिकेच्या बैठकीत, पाच व्यक्तींचे नामनिर्देशन, नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून महानगरपालिका करील.".

३. मूळ नियमाच्या नियम ५ मधील पोट-नियम (१) मध्ये पुढील परंतुके समाविष्ट करण्यात येतील, ते असे,—

" परंतु, असे की, मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यासाठी शिफारस करताना यथास्थिती मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५०स च्या पोट-कलम (२) किंवा मुंबई

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ३१अ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ च्या कलम ४०अ यामधील तरतुदीनुसार बनविलेल्या मान्यताप्राप्त अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे फ्रंटचे तौलनिक संख्याबळानुसार आयुक्त, प्रथम नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशनासाठी पूर्णांक विचारात घेईल आणि त्यानंतरही जर एक किंवा अधिक जागा शिल्लक राहिल्यास अपूर्णांकामध्ये ज्या मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्षाची किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे संख्याबळ सर्वात जास्त आहे, तेथून सुरुवात करून उतरत्या क्रमाने उर्वरित जागांचे वाटप पूर्ण करेल :

परंतु, आणखी असे की, वरील परंतुकात नमूद केल्यानुसार अपूर्णांकातील संख्याबळ उतरत्या क्रमाने विचारात घेऊन नावांचे नामनिर्देशन करताना, जर दोन किंवा अधिक मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडीची किंवा फ्रंटची अपूर्णांकातील संख्या सारखीच असल्यास, आयुक्त, अशा मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंटमधून नामनिर्देशित सदस्यांची शिफारस करण्यासाठी निवड, अशा सर्व संबंधित पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंटच्या उपस्थितीत चिठ्ठ्या टाकून करील.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आ. श्रा. जिवने,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th July 2012

*NOTIFICATION*

THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT, 1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.

No. MMC-2012/223/C.R.-68/2012/UD-32(1).—Whereas, it is expedient to immediately amend the Maharashtra Municipal Corporations (Qualifications and Appointment of Nominated Councillors) Rules, 2012 ;

And wherease the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to dispenses with the condition of previous publication thereof ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*1*) of section 5 and section 29 of the Mumbai Municipal Corporation Act (Bom.III of 1888), clause (*b*) of sub-section (*2*) of section 5 and section 456A of the Bombay Provincial Municipal Corporation Act, 1949 (Bom LIX of 1949) and clause (*b*) of sub-section (*1*) of section 9 and sub-section (*1*) of section 420 of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C.P. and Berar II of 1950) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, after consultation with the State Election Commissioner, hereby amends the Maharashtra Municipal Corporations (Qualifications and Appointment of Nominated Councilors) Rules, 2012, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Municipal Corporations (Qulifications and Appointment of Nominated Councilors) (Amendment) Rules, 2012.

2. In rule of 3 of the Maharashtra Municipal Corporation (Qualifications and Appointment of Nominated Councilors) Rules, 2012 (hereinafter referred to as "the Principal Rules"), the following rule shall be substituted, namely :—

" **3. Meeting for nomination of Councilors** :—Subject to the provisions of rule 4, the Corporation shall, in its meeting held immediately after the expiry of one month from the date of notification of election results, after general election, nominate five persons to be nominated Councilors.".

3. To the sub-rule (*1*) of rule 5 of the Principal Rules, the following provisos shall be added, namely :—

Provided that, while recommending the names of persons to be nominated Councilors on the basis of relative strengths of the recognized or registered parties or groups or aghadis or fronts, formed as per the provision of sub-section (*2*) of section 50S of the Mumbai Municipal Corporation Act, or section 31A of the Bombay Provincial Municipal Corporation Act, 1949 or section 40A of the City of Nagpur Corporation Act, 1948, as the case may be, the Commissioner shall first consider the whole number of the seats admissible for nomination of persons as nominated Councilors to such recognized or registered parties or groups or aghadis or fronts, as per their relative strengths and thereafter if one or more seats remain to be allotted, the same shall be allotted to such recognized or registered parties or groups or aghadis or fronts in the descending order of the fraction numbers, considering the highest fraction till all the seats of nominated Councillors are allotted :

Provided further that, while recommending the names on the basis of the descending order of the fraction number, as mentioned in the above proviso, if two or more recognized parties or groups or aghadis or fronts have the same fraction number, then the Commissioner shall, recommend the names of persons belonging to such recognized or registered parties or groups or aghadis or fronts, selected on the basis of lots drawn in the presence of all such concerned parties or groups or aghadis or fronts,".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. JIWANE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A,NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.